**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**शैक्षणिक**
शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश
ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय
पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २८१ वा | शनिवार, दि. २० जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आता ऑपरेशन कमळ राबवणार
## उद्धव ठाकरे यांची गर्जना, भाजपला धक्का देणार?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** माझ्या नेतृत्त्वावर होणारे आरोप तुम्हाला खरे वाटत असतील तर मी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला या क्षणी तयार आहे. माझ्या जागी एखाद्या सामान्य शिवसैनिकाला त्या पदावर बसवा.

मला नेतृत्त्वाची कोणतीही हाव नाही. मी कोणत्याही क्षणी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला तयार आहे, असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या वर्धापन दिन सोहळ्यात केले. आज मुंबईतील षणमुखानंद सभागृहात शिवसेना ठाकरे गटाचा 60 वा वर्धापनदिन पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाचा समारोप अत्यंत नाट्यमयरितीने केला. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडण्याची भाषा करताच उपस्थित शिवसैनिकांनी जागेवरुन उठून त्या प्रस्तावाला विरोध केला. उद्धव ठाकरे यांच्या या अनपेक्षित प्रस्तावामुळे आता ठाकरे गटात काही संघटनात्मक बदल होणार का, अशी चर्चा आता रंगू लागली आहे. एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर' राबवून दुसऱ्यांदा शिवसेना फोडून हा पक्ष खिळखिळा केला आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांची शिवसेना पक्षप्रमुखपद सोडण्याची ही खेळी ठाकरे गटाची नव्याने बांधणी करण्यात आणि पक्षात नवी जान फुंकण्याच्यादृष्टीने गेमचेंजर ठरणार का, हे आता बघावे लागेल.



उद्धव ठाकरे यांनी आपल्या संपूर्ण भाषणात नेहमीप्रमाणे भाजप आणि शिंदे सेनेला लक्ष्य केले. तसेच शिंदे सेनेसोबत जाणाऱ्या सहा खासदारांवरही टीकास्त्र सोडले. मात्र, आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी अचानकपणे शिवसेना पक्षप्रमुख पदावरुन पायउतार होण्याची भाषा केल्याने अनेकांना धक्का बसला. मी कसा आहे, तुम्हाला माहिती आहे. माझ्यावर बोट दाखवलं तर मी एक क्षण पदावर राहत नाही, हे तुम्ही मी मुख्यमंत्रिपद सोडलं तेव्हा पाहिलं आहे. मला पदाची हाव असती तर मी विधान परिषदेत गेलो असतो. आता शिवसेना पक्षाला 60 वर्षे पूर्ण होत आहेत. मी देखील गेली 12-13 वर्षे संघटनेचे नेतृत्व करत आहे. आता माझ्या नेतृत्त्वावर आरोप होत असतील तर मी या पदावरुन उतरायला तयार आहे. याचं उत्तर विचार करुन द्या. माझ्यावरील आरोप तुम्हाला खरे वाटत असतील तर मी पद सोडायला तयार आहे. फक्त अट एकच आहे की, ही सोन्यासारखी शिवसेना दरोडेखोर आणि गद्दारांच्या हातात जाऊन द्यायची नाही. (पान 2 वर..)

# हिम्मत असेल तर समोर या, तुमचे पाय...
## ठाकरेंच्या 'ऑपरेशन तुडावा'वर एकनाथ शिंदेंचं खुलं आव्हान!

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** उद्धव ठाकरे यांच्या सहा खासदारांनी बंड केलं आहे. हे सहा खासदार लवकरच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. खासदारांनी बंडखोरी केल्यानंतर ठाकरे यांच्या शिवसेनेने आक्रमक पवित्रा धारण केला आहे.

ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी तर बंडखोर खासदारांविरोधात ऑपरेशन तुडवा राबवले जाईल, असा इशारा दिला. मतदारसंघात बंडखोर खासदार दिसताच, त्यांना तुडवा, असा आदेशच राऊत यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिला. दरम्यान, आता ठाकरे गटाच्या याच ऑपरेशन तुडावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट भाष्य केलं आहे. त्यांनी राऊतांना तसेच ठाकरे गटाला थेट आव्हान दिले आहे. हिम्मत असेल तर पुढे



या, असं खुलं आव्हान शिंदे यांनी दिले आहे. ते शिवसेनेच्या 60 व्या वर्धापन दिनानिमित्त बोलत होते.

काही लोक म्हणाले की लांडग्यांचे ऑपरेशन करतो. परंतु तो (पान 2 वर..)

### उद्धव ठाकरे यांच्यावर टीका

उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, "रक्ताचे नाते सांगून, कोणी वारस होत नाही, सात बारवर नाव लावून कोणी वारस होत नाही, शिवसेना म्हणजे जमिनीचा तुकडा नाही, शिवसेना म्हणजे काळजाचा तुकडा आहे. बाळासाहेबांच्या हयातीत तुम्ही त्यांना त्रास देत होता. बाळासाहेब गेल्यानंतर त्यांना तिरस्कार असलेल्या लोकांचा पुरस्कार तुम्ही केला. शिवसेना पहिल्यांदा कोणी फोडली तर ती राष्ट्रवादीने. दुसऱ्यांदा कोणी फोडली तर ती काँग्रेसने. ते यांना पुढे करतात आणि ज्याने शिवसेनेचा भगवा यातून मुक्त केला त्याच्यावर टीका करतात."

# लहानपणापासून वाचनाची सवय लावा : डॉ. संध्या रघोजी






**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच वाचनाची आवड जोपासली पाहिजे. खेळ, संवाद आणि वाचन या तीन गोष्टी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. अभ्यासाबरोबरच मनोरंजन आणि विविध छंदही आवश्यक असून उत्तम पुस्तकांचे वाचन केल्याने व्यक्तिमत्त्व घडते. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य आणि सकारात्मक वापर करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यप्रेमी व व्याख्याते डॉ. संध्या रघोजी यांनी केले.

येथील दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेत राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका मनीषा पाटील या होत्या. यावेळी प्रिसिजन बुक क्लबचे श्रीधर खेडगीकर, पर्यवेक्षिका सुनिता गवळी, स्मिता हुमनाबादकर, दीपिका जवळगेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय वाचन दिनाचे औचित्य साधून प्रशालेतील उत्कृष्ट वाचक विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. आरुषी कोळी, रेवती बिराजदार, अभय शिंदे, जाई काटकर, ऋतिका तूरूप आणि सुजित रोडगे या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचक पुरस्कार प्रदान करून डॉ. रघोजी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापिका मनीषा पाटील यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, नियमित वाचनामुळे विद्यार्थ्यांचे शब्दभांडार समृद्ध होते. नवीन शब्द, नवीन विचार आणि विविध विषयांची माहिती मिळाल्याने ज्ञानकक्षा विस्तारतात. स्क्रीनवर वाचन करण्यापेक्षा प्रत्यक्ष पुस्तकांचे वाचन मुलांच्या मेंदूच्या विकासासाठी अधिक फायदेशीर ठरते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी श्रीधर खेडगीकर यांनीही विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त डॉ. संध्या रघोजी यांनी त्यांच्या मातोश्री प्रभा उपलेंचवार यांच्या स्मरणार्थ प्रशालेला पुस्तकांची भेट देऊन वाचन चळवळीला हातभार लावला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मल्लेश पुरवंत यांनी प्रास्ताविक केले. प्रीती कसबे यांनी फलकलेखनाची जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी आरुषी कोळी हिने केले, तर आदिती सावंत यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त झालेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यास निश्चितच मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# लोकप्रतिनिधीच्या अधिकारावर कायद्याने निर्बंध आणण्याची गरज; अन्यथा लोकशाहीला धोका - ॲड.सुरेश गायकवाड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेली २-३ महिन्यापासून देशात सरकारातील सत्ताधारी पक्ष वेगवेगळ्या माध्यमातून राज्यपातळीवरील छोटे राजकीय पक्ष संपविण्यासाठी वाट्टेल ते करत आहेत. यामध्ये भाजपा अव्वल स्थानी आहे.

आम आदमी पार्टी व पं.बगांल मधील टी.एम.सी. चे आमदार, खासदार फोडून झाले. आता महाराष्ट्रातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नऊ पैकी सहा खासदार ज्या पक्षातून निवडून आले त्यातून वेगळे करून दुसऱ्या सत्ताधाऱ्याना सोयीच्या असलेल्या पक्षात सामील करून घेतले. आता पर्यंत ३०-३२ खासदार सत्ताधारी पक्षाने स्वताकडे वळवले आहेत.

वास्तविक सत्तांतर करणारे लोकप्रतिनिधी हे निवडणूकीच्या वेळी शपथपत्रात संबंधीत पक्षाचे ध्येय धोरण राबविणार आहे, जनतेच्या प्रश्नांवर बांधीलकी राहील, निःपक्ष सेवा करू असे



आश्वासन देऊन संबंधीत पक्ष संघटनेची ताकद वापरून विजयी झाले होते..आज तेच लोकप्रतिनिधी मतदारांनी केलेल्या मतांचा अनादर करून स्वाथार्साठी पक्षांतर करत आहेत..करोडो रुपएची माया मिळवित आहेत. यावर लोकतंत्र, प्रशासन, जनता, निवडणूक आयोग, उपलब्ध कायदे व न्यायपालिका अंकुश ठेवण्यासाठी अपुरे पडत आहेत. हे वारंवार दिसून आले आहे.

ह्यातून एक अर्थाने लोकशाही चा गळा घोटण्याचा प्रकार सुरू आहे. यासाठी पक्षांतर बंदी कायदा, संविधानातील तरतुदी तकलादु ठरविण्यात येत आहेत.सुप्रीम कोर्ट देखील सोयीने अशी गुंतागुंतीची प्रकरणे हाताळून अपकृत्य करण्यासाठी एकप्रकारे बळ देत आहे. यामुळे "मतदार" हा "राजा" राहिला नसून एक बाहुले व विजयी लोकप्रतिनिधी ना पैसे मिळवून देणारे साधन ठरले आहे. हे लोकशाहीला अत्यंत घातक आहे.

आता लोकप्रतिनिधी ना पायबंद घालण्यासाठी कायदयात बदल करण्याची नितांत गरज आहे. मतदार व जनतेला गृहीत धरणारे पक्ष, लोकप्रतिनिधी यांना धडा शिकविण्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन छेडणे, कायद्यात कठोर तरतुदी करणे गरजेचे वाटते, अन्यथा लोकशाहीचा अंत होईल. आपण यासाठी जनहित प्रबोधनाची मोहिम राबविणार असल्याचे विधी सेवा फौंडेशन चे अध्यक्ष तथा प्रबोधन सेनेचे अध्यक्ष ॲड.सुरेश बापु गायकवाड यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# इंधन विक्रीवर तात्पुरते निर्बंध
## एका वाहनाला दिवसाला २०० लि. पेक्षा जास्त डिझेल मिळणार नाही

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** जागतिक भू-राजकीय घडामोडींमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने पेट्रोल आणि डिझेल विक्रीवर तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. नव्या आदेशानुसार औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहकांना किरकोळ पेट्रोल पंपांवरून इंधन खरेदी करता येणार नसून, त्यांना घाऊक ग्राहकांसाठी असलेल्या इंधन केंद्रांमधूनच इंधन घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच कोणत्याही ग्राहकाला एका वाहनासाठी प्रतिदिन २०० लिटरपेक्षा अधिक डिझेल विक्री करता येणार नाही. या इंधनाची पुनर्विक्री करण्यासही मनाई करण्यात आली असून तेल विपणन कंपन्या आणि किरकोळ विक्री केंद्र चालकांना या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश कमाल ९० दिवस किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहे.

केंद्र शासनाने ११ जून २०२६ रोजी 'मोटर स्पिरिट आणि उच्च गती डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे अस्थायी विनियमन) आदेश, २०२६' जारी केला होता. त्यानंतर राज्य शासनाने १२ जून २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे या सूचनांची राज्यभर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.




यापूर्वी ५ जून २०२६ रोजी राज्य शासनाने पेट्रोलियम उत्पादनांची साठेबाजी, काळाबाजार, किरकोळ विक्री केंद्रांमधून टँकर किंवा बाउजरमध्ये अनधिकृत इंधन भरणे, इंधनात भेसळ, गळती, अनधिकृत हस्तांतरण, जादा दर आकारणी तसेच निकृष्ट दर्जाचे इंधन पुरवठा यांसारख्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईचे आदेश दिले होते.

या आदेशांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, नियंत्रक शिधावाटप, संचालक नागरी पुरवठा, उपायुक्त पुरवठा, जिल्हा पुरवठा अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पोलीस उपअधीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेले सर्व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे अधिकार देण्यात आले आहेत.

# आषाढी वारीमध्ये वारकरी व भाविकांना उत्कृष्ट सुविधा देऊन सुरक्षेलाही प्राधान्य द्यावे - पालकमंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रा शनिवार दिनांक 25 जुलै 2026 रोजी भरणार असून, त्यानिमित्ताने आषाढी एकादशी पालखी सोहळा शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडावा तसेच वारीमध्ये वारकरी व भाविकांना उत्कृष्ट सुविधा तसेच त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याच्या अनुषंगाने काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

आज रोजी पुणे विभागीय आयुक्त कार्यालय येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे, सातारा, सोलापूर व अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांचा पालखी सोहळा नियोजनाचा आढावा प्रसंगी पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, सह आयुक्त नगरपालिका प्रशासन आशिष लोकरे, तहसीलदार पंढरपूर सचिन लंगोटे, पंढरपूर नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे, कार्यकारी अभियंता भीमा विकास विभाग पंढरपूर जी. एस. कथले, सहाय्यक आयुक्त अन्न प्रशासन साहेबराव देसाई, अधीक्षक अभियंता महावितरण सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्या सह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की पालखी मागार्ची सुरक्षितता,




रस्त्यातील अडथळे, रिंगण सोहळ्याचे ठिकाण, पालखी मुक्कामाची ठिकाणे, रस्ते व पूल दुरुस्ती अशी अन्य सर्व कामे संबंधित विभाग प्रमुखांनी स्वतः लक्ष घालून तत्परतेने पूर्ण करून घ्यावीत. पालखी मार्गावर लावण्यात येणारे फिरते शौचालय तसेच कायमस्वरूपी शौचालय स्वच्छ ठेवण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तात्पुरत्या शौचालयाजवळ चिखल राडाराडा होऊ नये, तसेच पालखी मुक्काम स्थळी योग्य त्या ठिकाणी कॉंक्रीटीकरण व मुरमीकरण दिलेल्या वेळेत पूर्ण करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

वारकऱ्यांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, निवाऱ्यासाठी जर्मन हँगर व वॉटरप्रूफ मंडप, फूट मसाज, आरोग्य सुविधा, मेडिसीन किट, स्नानगृहे, मोबाईल चार्जिंग व्हॅन, वारीतील वाहनांसाठी पुरेसे इंधन तसेच गॅस पुरवठा व इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. सर्व विभागांनी हा पालखी सोहळा सर्वोत्तम म्हणून पार पाडण्यासाठी नियोजन करावे, निर्विघ्नपणे व आनंदी वातावरणात सोहळा पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, काही अडचणी निर्माण झाल्यास शासनास त्वरित कळवावे आणि ही जबाबदारी सेवाभाव समजून पूर्ण करावी, असेही आवाहन त्यांनी केले.

वारीदरम्यान मोबाईलसाठी पुरेसे नेटवर्क मिळण्यासाठी अधिक टॉवरची सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे, निरीक्षण टॉवर, ठिकठिकाणी ध्वनीक्षेपक, आपत्कालीन परिस्थितीत अग्निशामक दल, तसेच नदी परिसरात लाइफ जॅकेट व बोटींग सुविधा देण्याबाबतही पालकमंत्र्यांनी आढावा घेतला. जर्मन हँगर उभारताना खाली जमिनीची लेव्हल एकसारखी असावी, पंढरपूरच्या कॉरिडॉरच्या धरतीवर पालखी मार्गावरील व सर्व सुविधांमध्ये गुणवत्ता राखली जावी, तसेच वारीच्या काळात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये. यासाठी अत्यंत दक्ष राहून वारी यशस्वी करावी, अशा ही सूचना गोरे यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी शासन स्तरावरून करण्यात आलेल्या नियोजनाबाबत पालकमंत्र्यांना माहिती दिली. 65 एकर, वाळवंट परिसर आणि वाखरी या ठिकाणी स्वच्छतेबाबत आवश्यक सुविधांचे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हा परिषदेतर्फे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती सादर केली. ग्रामीण भागातून पालखी पुढे गेल्यानंतर व आधी स्वच्छता करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले. जिल्हा परिषदेतर्फे पालखी मार्गावरील स्वागत कमानी, फिरते शौचालय 5000, पाण्याचे टँकर 220, तात्पुरते उपचार केंद्र 158, बाईक ॲम्बुलन्स 121, मेडिसिन किट 4500 हे दिंडी प्रमुखांना वाटप करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली. तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत पालखीतील मानाचे घोडे व बैल यांच्यासाठी चारा व निवारा याची सोय केली जाणार असून 23 ठिकाणी जर्मन हँगर असतील, असेही त्यांनी सांगितले.

याशिवाय पालखी विश्वस्त ॲड राजेंद्र उमाप यांनी माऊलीच्या पालखीच्या वतीने वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा, तसेच मोबाईल नेटवर्क उपलब्ध करून द्यावे, आणि वाहनांना टोल माफी मिळावी अशी मागणी केली. संत तुकाराम पालखी विश्वस्त व सोपानकाका पालखी विश्वस्त यांनीही वारकऱ्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी केली.

**ना ऑफिस, ना भांडवल**
**तरीही स्वत:च्या उद्योगाचे मालक व्हा!**

नमस्कार....,

होय, आपल्याकडे ऑफस व भांडवल नसूनही, स्वतःच्या उद्योगाचे 'मालक' होवून मानसन्मानासह पैसे कमवा. उद्योगासाठी जागा व भांडवल प्रचंड लागते. मग कुठं २ ते २५ टक्के नफा मिळतो. अनेकांना तर मासिक दहा ते पंधरा हजारातच जीवन कंठावे लागते. तुमची सध्याची नोकरी व व्यवसाय करत करत फावल्या वेळात आणखी पैसे कमवू इच्छित असाल तर ! 'जाहीरात उद्योजक' म्हणून काम करा. अनं २५ ते ५० टक्के 'कमिशन' मिळवत स्वतःच्या उद्योगाचे मालक व्हा! कोणताही सुजाण नागरिक 'जाहीरात उद्योजक' होवू शकतो. त्यासाठी १०००/- रूपये भरून सभासद (वार्षिक वर्गणीदार) होणे आवश्यक आहे. सभासदास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक 'कटूसत्य' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून किंवा Dainik Solapur Katusatya, Bank of Maharashtra, AC:- 60438686652, IFSC:- MAHB0000627 या खात्यावर आपली रक्कम जमा करून सभासद व्हा. आणि 'जाहीरात उद्योजक' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, आधरकार्ड आणि subject मध्ये 'जाहीरात उद्योजक' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठविल्यास या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १)संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल 'जाहीरात उद्योजक' ओळखपत्र मिळेल. २) 'जाहीरात उद्योजक' प्रिंट ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल खर्च २००/- रूपये द्यावे लागतील. (कार्यालयात येवून घेऊन गेल्यास खर्च घेणार नाही.) ३) महाराष्ट्रातील कोणीही 'जाहीरात उद्योजक' होवू शकतो. ५) आमच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या रक्कमेवरच २५% ते ५०% कमिशन दिले जाईल. ६) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार कार्यालयाकडे राखीव ठेवले आहेत. ७) मग..! चला तर, आजच 'जाहीरात उद्योजक' होवून, स्वतःच्या उद्योगाचे मालक व्हा...!!

**संपर्कासाठी पत्ता**
**कार्यालयः दै.कटूसत्य कार्यालय, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर. फोन:०२१७३५५०५९२,मो.९७६५३९०३३९**

## संपादकीय

# न्यायालयावर संशयाची सावली; लोकशाहीसाठी धोक्याची घंटा

लोकशाहीच्या चार स्तंभांमध्ये न्यायव्यवस्था हा सर्वात महत्त्वाचा आणि शेवटचा आधारस्तंभ मानला जातो. कार्यपालिका, विधिमंडळ किंवा इतर संस्थांबाबत नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाले तरी शेवटी न्यायालयावर विश्वास ठेवून सामान्य माणूस न्यायाची अपेक्षा करतो. मात्र एखाद्या न्यायालयीन खटल्याचा निकाल ठरवून दिला जाईल, निकालाला विलंब लावला जाईल किंवा त्याबाबत राजकीय पातळीवर आश्वासने दिली जात आहेत, अशा प्रकारच्या चर्चांनी समाजमन अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे.

आमदार रोहित पवार यांनी सामाजिक माध्यमांवर केलेल्या वक्तव्यामुळे सध्या याच मुद्द्यावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. त्यांच्या पोस्टमध्ये न्यायालयीन प्रक्रियेवर प्रभाव टाकल्याचा किंवा तसे आश्वासन दिल्याचा गंभीर संकेत देण्यात आला आहे. या दाव्यांचे सत्य-असत्य न्यायालयीन किंवा अधिकृत चौकशीशिवाय निश्चित होऊ शकत नाही. परंतु या चचेर्मुळे निर्माण झालेला प्रश्न अत्यंत गंभीर आहे. न्यायव्यवस्था खरोखरच पूर्णपणे स्वतंत्र आणि दबावमुक्त आहे का?

न्यायालयांवर जनतेचा विश्वास हा कोणत्याही कायदेशीर आदेशापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो. न्याय केवळ झाला पाहिजे असे नाही, तर तो निष्पक्षपणे झाला आहे हे लोकांना दिसलेही पाहिजे. जर निकालांबाबत राजकीय सौदेबाजी, दबाव किंवा हस्तक्षेपाच्या अफवा पसरू लागल्या, तर त्याचा सर्वात मोठा फटका न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेला बसतो.

आज देशात विविध संस्थांच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे चित्र दिसत आहे. तपास यंत्रणा, घटनात्मक संस्था, प्रशासकीय यंत्रणा यांच्याबाबत सातत्याने आरोप-प्रत्यारोप होत असतात. अशा परिस्थितीत न्यायालय ही शेवटची आशा मानली जाते. त्यामुळे न्यायालयांबाबत संशय निर्माण करणारे कोणतेही वक्तव्य किंवा घटना अधिक संवेदनशील ठरतात.

याठिकाणी दोन गोष्टी स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. पहिली म्हणजे, कोणत्याही आरोपाला पुरावे असणे गरजेचे आहे. केवळ राजकीय आरोपांच्या आधारावर न्यायव्यवस्थेवर अविश्वास व्यक्त करणे योग्य ठरणार नाही. दुसरी आणि अधिक महत्त्वाची बाब म्हणजे, जर अशा प्रकारच्या चर्चांना काही आधार असेल, तर त्याची सखोल आणि पारदर्शक चौकशी होणे तितकेच आवश्यक आहे. कारण न्यायालयीन स्वायत्ततेवर पडलेला अगदी छोटासा डागही लोकशाहीसाठी घातक ठरू शकतो.

न्यायालयांनी आपल्या निर्णयांद्वारे अनेकदा सरकारांना धारेवर धरले आहे, घटनात्मक मूल्यांचे संरक्षण केले आहे आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण केले आहे. त्यामुळे न्यायव्यवस्था पूर्णपणे कोणाच्या इशाऱ्यावर चालते, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. परंतु त्याचवेळी न्यायालयीन प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याच्या चर्चांकडे दुर्लक्ष करणेही योग्य नाही.

लोकशाहीमध्ये संस्थांवरील विश्वास टिकवून ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. राजकीय नेत्यांनी गंभीर आरोप करताना पुरावे समोर आणले पाहिजेत, तर न्यायव्यवस्थेनेही अशा चर्चांमुळे निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी आवश्यक तेवढी पारदर्शकता दाखवली पाहिजे. मौन अनेकदा संशयाला खतपाणी घालते.

आजचा खरा प्रश्न एखाद्या व्यक्तीच्या खटल्याचा किंवा निकालाचा नाही. प्रश्न आहे तो न्यायव्यवस्थेवरील लोकांच्या विश्वासाचा. कारण जर सामान्य माणसाच्या मनात "न्याय विकत मिळतो का?" किंवा "निकाल आधीच ठरलेले असतात का?" असे प्रश्न निर्माण झाले, तर लोकशाहीच्या पायाचाच पाया हादरू शकतो.

न्यायालयीन स्वायत्तता ही केवळ न्यायाधीशांची किंवा वकिलांची बाब नाही; ती प्रत्येक नागरिकाच्या स्वातंत्र्याशी आणि संविधानिक अधिकारांशी निगडित आहे. म्हणूनच या प्रकरणात सत्य काय आहे हे समोर येणे आवश्यक आहे. आरोप खोटे असतील तर ते स्पष्टपणे खोडून काढले गेले पाहिजेत; आणि आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे.

कारण न्यायव्यवस्थेवरील विश्वास एकदा गमावला, तर तो पुन्हा मिळवणे कोणत्याही संस्थेसाठी अत्यंत कठीण असते. आणि न्यायावरील विश्वास हरवणे म्हणजे लोकशाहीच्या आत्म्यालाच जखम होणे होय.

# आंबा, कोय आणि जीवनसूत्र

उन्हाळा हा तापदायक ऋतू आहे. दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्यांना तर उन्हाळा फारच जाचक वाटतो. उष्माघातामुळे दरवर्षी अनेकांचे मृत्यूही होतात. मात्र याच उन्हाळ्यात निसर्गाच्या चमत्कारातून माणसाला आनंद आणि सुख मिळते. गुलमोहर बहरतो, जांभळाच्या झाडाखाली जांभळ्यांचा सडा पडतो आणि आंब्याची झाडे फळांनी लगडून जातात.

आंब्याच्या झाडाला मोहर लागण्यापासून ते कैऱ्या तयार होईपर्यंत होणारे बदल एखाद्या गर्भवती स्त्रीच्या मातृत्वप्रवासाप्रमाणे नजरेत साठवण्यासारखे असतात. कैऱ्यांना पाड लागला की त्या अर्धकच्च्या आंब्यांच्या रूपात दिसू लागतात. हे आंबे झाडावरून उतरवून घरी आणले जातात आणि गवताच्या चघळात त्यांची आडी लावली जाते. काही दिवसांत ते पिकतात आणि बाजारपेठेत विक्रीसाठी जातात.

जुन्या वळणाचे काही लोक आपल्या पूर्वजांना आंबा किंवा आंब्याचा रस नैवेद्य म्हणून अक्षय तृतीयेला अर्पण केल्याशिवाय आंबे खात नाहीत. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच आवडणारा आंबा उन्हाळ्याचा त्रास गोड करतो. मुले चोखून आंबे खातात, तर मोठी माणसे कापून खातात. एखाद्या प्रौढ व्यक्तीतील बालमन अजूनही जिवंत असेल, तर तोही लहान मुलांप्रमाणे चोखून आंबा खाण्याचा आनंद घेतो.

आंब्याचा रस हा घराघरांतील उन्हाळी आहारातील आनंद द्विगुणित करणारा पदार्थ बनतो. मधुमेह असणाऱ्यांना आंबे खाण्यात संयम बाळगण्याचा सल्ला दिला जातो; परंतु मनावर नियंत्रण मिळवणे सर्वांनाच जमत नाही. आंब्याच्या काही जाती विशेष लोकप्रिय आहेत. हापूस आंब्याला सर्वाधिक मागणी असली तरी केशर, पायरी, तोतापुरी यांसारखे आंबेही त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे लोकांच्या पसंतीस उतरतात.

आंब्याचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे एका आंब्याच्या कोयीपासून पुन्हा नवीन झाड जन्माला येते. त्या झाडाला सात-आठ वर्षांनी आंबे लागतात आणि त्या आंब्यांच्या कोयी पुन्हा नव्या झाडांना जन्म देतात. निसगार्चे हे अद्भुत चक्र वर्षानुवर्षे अखंड सुरू आहे. एका झाडापासून हजारो-लाखो झाडे निर्माण होण्याची ही प्रक्रिया समजून घेताना त्यातून जीवनाचेही एक महत्त्वाचे सूत्र शिकण्यासारखे आहे.

पैसा, मूल्ये आणि जिव्हाळा यांची पेरणी आंब्याच्या कोयीप्रमाणे केली पाहिजे. पैसा हा खरोखरच आंब्यासारखा आहे. कोय म्हणजेच बचत करायची रक्कम तर वरील गर म्हणजेच तत्काळ खर्च करायची रक्कम. ज्या रकमेतून आपला घर खर्च, चैन विलास आणि मौज मजा करता येते. पैसा बचत करून योग्य ठिकाणी गुंतवणे म्हणजे आंबा खाऊन त्याची कोय जमिनीत पेरण्यासारखे आहे. काही वर्षांनी त्या पैशाला पैशांची फळे लागलेली दिसतात. आज मिळणारे उत्पन्न केवळ खर्च करत राहणे म्हणजे आंबा खाऊन त्याची कोय कुठेही फेकून देण्यासारखे आहे. परंतु बचत करून ते पैसे पीएफ, एसआयपी किंवा इतर गुंतवणूक योजनांमध्ये टाकणे म्हणजे कोय पेरून तिची निगा राखण्यासारखे आहे.

मूल्यांचेही तसेच असते. आपल्या व्यक्तिमत्त्वातील सद्गुणांची पेरणी पुढच्या पिढीत केली पाहिजे. दुर्गुण आणि वाईट कृत्ये आंब्याच्या गोड गराप्रमाणे आकर्षक वाटू शकतात; परंतु त्यातील सुसंस्कार, संयम आणि सद्वर्तनाचा गाभा शोधून तो जपला पाहिजे. तो स्वतःमध्ये रुजवला आणि वाढवला पाहिजे. आणि पुढच्या पिढीला देखील वारसा रूपाने दिला पाहिजे.

ज्याप्रमाणे आर्थिक क्षेत्रात 'कंपाऊंडिंग'चा नियम काम करतो, त्याचप्रमाणे सद्गुण, संस्कार आणि चांगली कृत्येही समाजजीवनात कार्यरत असतात. एका चांगल्या विचारापासून अनेक चांगले विचार जन्म घेतात, एका सुसंस्कारित व्यक्तीकडून अनेक सुसंस्कारित व्यक्ती घडतात आणि एका चांगल्या कृतीतून समाजपरिवर्तनाची बीजे रुजतात. म्हणूनच आंबा खाताना त्याची कोय फेकून देऊ नका; तिच्यामध्ये दडलेले जीवनसूत्र ओळखा. पैसा, मूल्ये आणि माणुसकी यांची बीजे पेरा. कारण आज पेरलेली प्रत्येक चांगली कोय उद्याच्या समृद्ध, सुसंस्कृत आणि सुंदर समाजाचे विशाल वृक्ष बनू शकते.



– **किशोर जाधव**, सोलापूर
मो. नं.- ९९२२८८२५४१

पान १ वरून

## आता ऑपरेशन कमळ राबवणार...

माझ्यावर कोणी आरोप करत असेल तर त्याला उत्तर तुम्ही द्यायचं आहे. मला नेतृत्त्वाची हाव नाही. त्यामुळे मी पद सोडायला तयार आहे. बाकी मी डगमगलेलो नाही, खचलेलो नाही. अनेक संकटं आणि वादळं आली तरी मी पहाडासारखा उभा राहीन. पण ज्यावेळी मी पद सोडावं असं तुम्हाला वाटेल तेव्हा मी पद सोडल्याशिवाय राहणार नाही, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाचा शेवट केला.

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की ज्या पद्धतीने देशाचं राजकारण सुरू आहे. ते पाहिल्यावर लोकांचं लोकशाहीवरचा विश्वास उडत चालला आहे.तुम्हाला नेमके किती आमदार खासदार हवेत असा सवाल यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगर सुरु केले आहे. याचा उल्लेख करीत उद्धव ठाकरे म्हणाले की आता जे दिवस आलेले आहेत. डॉक्टर लोकं प्रश्नचिन्हांकित झालं आहे. आपण करतोय काय.एक कार्टुन आल होते. एका सोने चोराला पोलिसांनी पकडलं. तो म्हणतो साहेब चोरी म्हणू नका. ऑपरेशन गोल्ड म्हणा.! असं चालू असेल तर आपल्याला ऑपरेशन कमळ करावे लागेल असा इशारा उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.

उद्धव ठाकरे म्हणाले की हा लोकशाहीला धोका आहे. असंच सुरू राहिलं तर देश अराजकाकडे चालला आहे. मी भाकीत करत नाही. मी ज्योतिष नाही. ते दिसतंय. ज्या देशात तरुणाईला झुरळ म्हटलं जातं त्या देशाचं भविष्य काय असेल. वाटेल ते करून निवडणुका जिंकल्या जात आहे. पलिकडून कुणाला अर्ज भरूच दिला जात नाही. एवढं करून कुठे जाणार आहे. काय करणार आहात देशाचं. नड्डा म्हणाले होते देशात एकच पार्टी राहिल. यांची वाटचाल नो वन पार्टी नो इलेक्शन. भाजप दोस्त होता. प्रेमळ सल्ला देतो. या वाटेनं जाल तर दीर्घकाळ सत्ता लाभणार नाही. तरुणांना झुरळ म्हणत असाल तर मुलं पेटली तर तुमचं सरकार राहणार नाही असा इशारा उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.

### ही पापं कुठे फेडाल, तुमच्या कपाळावरचा गद्दारीचा शिक्का कसा पुसाल?

लोकसभा निवडणुकीत धाराशिवमध्ये माझी सभा झाली होती, तेव्हा भाषण संपल्यानंतर एक शेतकरी माझ्याकडे बटवा घेऊन आला. त्याने त्याच्याकडील पैशाचा बटवा खासदार निवडून आणण्यासाठी मदत म्हणून देऊ केला होता. समोरुन पैशांचा महापूर असतानाही अशा शेतकरी आणि सामान्य लोकांच्या जीवावर आपण ती निवडणूक जिंकली. मग आता येथील खासदार दुसऱ्या पक्षात जात असतील तर हे पाप कुठं फेडतील? त्यावेळी धाराशिवचे उमेदवारच बोलले होते की, खंडोजी खोपडे आणि सूयार्जी पिसाळ म्हटलं की तुम्हाला काय आठवतं? त्यांना 400 वर्षे झाली तरी गद्दारीचा शिक्का पुसता आला नाही तर तुम्हाला गद्दारीचा शिक्का पुसायला किती वर्षे जावी लागतील, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

# श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्या उपाध्यक्षपदी राजेशम येमूल यांची बिनविरोध निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** :- श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्या उपाध्यक्षपदी राजेशम भूमय्या येमूल यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहायक निबंधक उमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली.



निवडीनंतर रुग्णालयाच्या संचालिका डॉ. लता मिठ्ठाकोल यांनी मावळते उपाध्यक्ष रमेश विडप यांचा सत्कार केला. यावेळी रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. माणिक गुरंम आणि संचालक डॉ. विजयकुमार अरकाल यांनी विडप यांच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कामगिरी, रुग्णसेवेतील तत्परता आणि संस्थेच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले.

नूतन उपाध्यक्ष राजेशम येमूल यांनी मनोगत व्यक्त करताना निवडणूक निर्णय अधिकारी उमेश पवार, संस्थेचे अध्यक्ष बोल्ली तसेच संचालक मंडळाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रुग्णालयाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि रुग्णसेवा अधिक दजेर्दार करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी यावेळी डॉ. सचिन बलदवा, लक्ष्मीनारायण कुचन, श्रीनिवास कमटम, अशोक आडम, मनोहर अन्नलदास, रमेश विडप, पार्वतय्या श्रीराम, इरेशम कोंपेल्ली, तज्ज्ञ संचालक डॉ. भारत मुळे, प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेन, दुगार्दास येमूल यांच्यासह रुग्णालयातील प्रमुख पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## हिम्मत असेल तर समोर या, तुमचे

तर कंपाऊंडर आहे ना. कंपाऊंडर कसं ऑपरेशन करणार. इथे श्रीकांत शिंदे खरे डॉक्टर आहेत. मी डॉक्टर नसलो तरी अजूनही ऑपरेशन करतो. पण ऑपरेशन करायला वाघाचं कळीज लागतं लांडग्यांचं नाही. वाघाचं कातडं पांघरून लांडका वाघ होत नाही. चार वषार्पूर्वी मला याच लांडग्यांनी धमक्या दिल्या होत्या. मुंबईत यावंच लागेल. वरळीतून जावंच लागेल. मुंबई कोणाची जहागीर आहे का. एकनाथ शिंदे तेव्हा एकटा आला. त्यावेळी एअरपोर्टवरून हेलिकॉप्टर बाजूला ठेवून गाडीमध्ये गेलो. बयरोड वरळीतून गेलो. मी वरळीत जाऊन थांबलो, असं यावेळी शिंदे म्हणाले.

### हिम्मत असेल तर समोर या

मला धमक्या देणारे मला तेव्हा ऑनलाईन पाहात होते. आता म्हणतात की तुडवा ऑपरेशन राबवायचं. हिम्मत असेल तर समोर या. आमचे शिवसैनिक तुमचे पाय जागेवर ठेवतील का? असे रामदास कदम म्हणाले आहेत, असं खुलं आव्हान शिंदे यांनी राऊत आणि उद्धव ठाकरे यांना त्यांच नाव न घेता केले. आमचे कडवे शिवसैनिक आहेत.आमचे शिवसैनिक बाळासाहेबांच्या विचाराचे आहेत. सकाळी खासदारांना शिव्या द्यायच्या. संध्याकाळी खासदारांना चांगलं म्हणायचं. सेनापतीने घरी बसून चालत नाही. सेनापतीने समोर येऊन लढावं लागतं, अशी बोचरी टीकाही त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

### हा एकनाथ शिंदे लढवय्या आहे

हा एकनाथ शिंदे नेहमी छातीचाकोट करून लढणार आहे, असं मी माझ्या कार्यकर्त्यांना नेहमी सांगतो. हा एकनाथ शिंदे लढवय्या आहे. त्यांच्या हातातून महापालिका गेल्या, ग्रामपंचायती गेल्या, जिल्हा परिषदा गेल्या. मुंबई सोन्याचं अंडं देणारी कोंबडी आहे म्हणून त्यांनी जोर दिला. परंतु लोकांनी महायुतीला पसंती दिली. मुंबईत शंभर टक्के काँक्रिटचे रस्ते होणार आहेत. मेट्रो बंद होती, मेट्रोचे काम सुरू केले. समृद्धी महामार्ग सुरू केला. कोस्टल रोड सुरू केला. म्हणूनच जनतेने महायुतीला विजय मिळवून दिला. यांचं दिल्लीतही तेच, दिल्लीतही तेच आहे.

# मराठी भाषा प्रमाणपत्र नसल्यास 15 ऑगस्टनंतर अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई

**मुंबई, (कटूसत्य वृत्त)**:- राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. 1 जून ते 15 ऑगस्ट 2026 या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा ह्यमराठी भाषा संवाद पाठ्यक्रमह्न पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, 15 ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे.

परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात (एमएमआर) प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून यासाठी सुमारे 71 अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे (आरटीओ) अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत.


प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची अडचण दूर करणे, सेवा अधिक दर्जेदार बनविणे आणि चालकांच्या व्यावसायिक संधी वाढविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे विभागाने कळविले आहे. मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाल्याने प्रवासी व चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असून दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यास मदत मिळणार आहे.

परिवहन विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे की, 15 ऑगस्ट 2026 नंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या अमराठी चालकांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. मात्र कोणावरही कारवाई करण्याचा उद्देश नसून, सर्व चालकांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन वेळेत प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन सहआयुक्त रवी गायकवाड यांनी केले आहे.

# इंधन साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून उपाययोजना

**मुंबई,(कटूसत्य वृत्त)**:- औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहकांनी किरकोळ पेट्रोल पंपांवरून पेट्रोल-डिझेल खरेदी न करता घाऊक ग्राहकांसाठी असलेल्या इंधन केंद्रांमधूनच इंधन खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच कोणत्याही ग्राहकाला एका वाहनासाठी प्रतिदिन 200 लिटरपेक्षा अधिक डिझेल विक्री करता येणार नाही. या इंधनाची पुनर्विक्री करण्यासही मनाई करण्यात आली आहे. तेल विपणन कंपन्या आणि किरकोळ विक्री केंद्र चालकांनी या निर्बंधांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असून हा आदेश कमाल 90 दिवस किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहे.

जागतिक भू-राजकीय घडामोडींमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या उपलब्धतेवर ताण निर्माण झाला आहे. काही ठिकाणी औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहकांकडून किरकोळ पेट्रोल पंपांवरून मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेल खरेदी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.



या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने 11 जून 2026 रोजी "मोटर स्पिरिट आणि उच्च गती डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे अस्थायी विनियमन) आदेश, 2026" जारी करून इंधन विक्रीवर तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. राज्य शासनानेही 12 जून 2026 रोजीच्या आदेशाद्वारे या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

यापूर्वी राज्य शासनाने 5 जून 2026 रोजी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे पेट्रोलियम उत्पादनांची साठेबाजी, काळाबाजार, किरकोळ विक्री केंद्रांमधून टँकर किंवा बाउजरमध्ये अनधिकृत इंधन भरणे, इंधनात भेसळ, गळती, अनधिकृत हस्तांतरण, जादा दर आकारणी; तसेच निकृष्ट दर्जाचे इंधन पुरवठा यांसारख्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, नियंत्रक शिधावाटप, संचालक नागरी पुरवठा, उपायुक्त पुरवठा, जिल्हा पुरवठा अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पोलीस उपअधीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेले सर्व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

राज्य शासनाने सर्व संबंधित यंत्रणांना इंधन साठेबाजी, काळाबाजार व इतर गैरप्रकारांवर कठोर नजर ठेवून दोषींविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

# अवैध गॅस व डिझेल चोरी प्रकरणी कारवाई

## धुळे जिल्ह्यात १.५६ कोटींचा मुद्देमाल जप्त

**मुंबई, (कटूसत्य वृत्त)**:- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या राज्य दक्षता पथकाने दोन दिवस पाळत ठेवून गुजरात-धुळे महामार्गावर अवैधरित्या गॅस व डिझेल चोरी करणाऱ्या टोळीवर धडक कारवाई केली. या कारवाईत भारत पेट्रोलियम कंपनीचा एलपीजी गॅस टँकर, एचपी कंपनीचा डिझेल टँकर, १४० व्यावसायिक गॅस सिलिंडर; तसेच अन्य साहित्य असा सुमारे १ कोटी ५५ लाख ९५ हजार ११४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी तिघांना रंगेहात पकडण्यात आले.



ही कारवाई धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दहिवल गावाजवळ, सुरत-धुळे महामार्गावरील अन्नपूर्णा ढाब्याच्या मागे व पार्श्वनाथ ढाब्यालगत करण्यात आली. राज्य दक्षता पथकाने दोन दिवस पाळत ठेवून गॅस व डिझेल टँकरमधून इंधनाची अवैध चोरी सुरू असताना छापा टाकला.

कारवाईदरम्यान गुजरातहून जळगावकडे जाणारा जीजे-०६ एझेड-४४३० क्रमांकाचा एलपीजी गॅस टँकर, त्यातील १७.४२ मेट्रिक टन एलपीजी गॅस, जीजे-१२ बीझेड-७९९९ क्रमांकाचा डिझेल टँकर, त्यातील ३५ किलोलीटर डिझेल, तसेच बोलेरो पिकअप, छोटा ट्रक, १३० व्यावसायिक गॅस सिलिंडर, गॅस भरण्याचे साहित्य, वजनकाटे आणि ड्रममधील डिझेल साठा जप्त करण्यात आला.

जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये एलपीजी गॅस टँकर व गॅस साठा, डिझेल टँकर व डिझेल साठा, बोलेरो पिकअप, छोटा ट्रक, व्यावसायिक गॅस सिलिंडर, गॅस भरण्याचे नॉझल, वजनकाटे आणि इतर साहित्याचा समावेश आहे. ही कारवाई राज्य दक्षता पथकातील दीपेंद्र परुळेकर, अमोल बुरटे, पवन कुंबले, रवींद्र राठोड, राजेश सोरते, राहुल इंगळे, देवानंद इंगळे आणि राजीव भेले यांनी केली. अवैध इंधन व गॅस चोरीविरोधातील ही अलीकडील काळातील मोठी कारवाई मानली जात असून, संबंधित आरोपींविरुद्ध पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली.

# एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणासाठी सूचना आणि अभिप्राय पाठविण्याचे आवाहन

**मुंबई, (कटूसत्य वृत्त)**:- राज्यातील एकल महिलांना सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी राज्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ज्ञ यांनी आपल्या सूचना व अभिप्राय ८२०८५८९१९५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे महिला व बालविकास अधिकारी शरद कुऱ्हाडे यांनी केले आहे.

एकल महिलांसमोरील समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या सोडविण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात; तसेच विद्यमान योजनांमध्ये, कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, याबाबत सविस्तर सूचना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अभिप्राय पाठविताना केवळ मत नोंदविण्याऐवजी संबंधित विषयाची पार्श्वभूमी, सुचविलेली उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेला सुस्पष्ट प्रस्ताव सादर करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

एकल महिलांसाठी तयार होणारे धोरण अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक व्हावे, यासाठी समाजातील एकल महिला; तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे नमूद करून अधिकाधिक नागरिकांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असेही करण्यात आले आहे.

## वात्रटिका

### नेत्यांचे शिकला पाऊस

नेत्यांचे आम्हाला कळू शकते
पण आता त्याचीही हुलकावणी...
त्याच्या अशा वागण्याने आमची
अवस्था झाली केविलवाणी...
आता त्याने कोसळले पाहिजे
आणि सर्वांना दिलासा द्यावा...
इथल्या अनिश्चित घडामोडींची
त्याच्याही डोक्यात शिरली हवा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# आषाढी वारी व मान्सून च्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** आषाढी वारी आणि येणाऱ्या मान्सून कालावधीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार अक्कलकोट व परिसरातील पोलिस पाटील, महसूल सेवक, अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पोलिस विभागाचे कर्मचारी यांना रेस्क्यू बोट चालवणे, बचाव कार्य करणे तसेच पोहणे व बचाव तंत्र (technique) याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात आज अक्कलकोट तालुक्यात करण्यात आली. यावेळी पोलिस पाटील, महसूल सेवक आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षण/कार्यशाळेसाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशिक्षक, तसेच बजरंग होतकर रेस्क्यू अकॅडमी प्रशिक्षक आणि आपदा मित्र सोलापूर हे प्रशिक्षक म्हणून सहभागी आहेत. प्रशिक्षणास सहाय्य म्हणून अरुणा राठोड आपदा सखी सोलापूर, आशा सेविका होटगी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सागर धप्पादुळे आपदा मित्र शुभांगी गवते आपदा सखी सोलापूर सहाय्यक प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शनात नियोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत पुढील टप्प्यांमध्ये अक्कलकोट तहसील व नगरपालिका, माढा तालुका व कुर्डुवाडी नगरपालिका, मोहोळ तालुका, बार्शी तालुका व बार्शी नगरपालिका, उत्तर सोलापूर तालुका, अपर मंद्रुप तहसील, करमाळा तालुका व माळशिरस तालुका या भागांतील संबंधित यंत्रणांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# तांदूळवाडी दुर्घटनेनंतर उघड्या विहिरींचे सर्वेक्षण सुरू



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी परिसरात चार दिवसांपूर्वी झालेल्या भीषण वाहन अपघाताची जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून, घटनेच्या सखोल चौकशीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष एस. कार्तिकेयन यांनी विशेष चौकशी समिती गठित केली आहे.

या समितीमार्फत अपघातस्थळासह रस्त्यालगतच्या धोकादायक आणि संरक्षक भिंतीविना असलेल्या उघड्या विहिरींचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक सुधारात्मक उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

समितीकडून अपघातामागील नेमकी कारणे शोधण्याचे काम केले जाणार आहे. रस्त्याच्या रचनेतील त्रुटी, वाहनाचा वेग, तांत्रिक बिघाड अथवा इतर संभाव्य कारणांचा तपशीलवार तपास केला जाणार आहे. चौकशी अहवाल जिल्हा रस्ता सुरक्षा समितीकडे सादर करण्यात येणार असून त्याआधारे आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय कारवाई केली जाईल.

या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच ग्रामीण रस्त्यांच्या कडेला असलेल्या धोकादायक विहिरींचे सर्वेक्षण करण्यासाठी तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

**समित्यांना दिलेले प्रमुख निर्देश**

- रस्त्यालगतच्या धोकादायक विहिरींचे तात्काळ सर्वेक्षण करून यादी तयार करणे.
- संबंधित विहीर मालक अथवा प्राधिकरणास संरक्षक भिंत, लोखंडी जाळी व रिफ्लेक्टर बसविण्याचे आदेश देणे.
- आदेशांचे पालन न करणाऱ्या निष्काळजी मालमत्ताधारकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे.
- अपघातप्रवण ठिकाणांची स्वतंत्र नोंद करून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत रस्त्यालगतच्या धोकादायक ठिकाणांवर तातडीने उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त शिवछत्रपती पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या पालकांचा सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** दिनांक 23 जून 1894 रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीची स्थापना झाल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी 23 जून हा दिवस जगभर जागतिक ऑलिम्पिक दिन म्हणून साजरा केला जातो. खेळाडूंमध्ये क्रीडाभावना, उत्कृष्टतेचा ध्यास, सहभागाची प्रेरणा आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.

या पार्श्वभूमीवर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर व स्वामी विवेकानंद हायस्कूल, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. 23 जून 2026 रोजी सायंकाळी 4.30 वाजता स्वामी विवेकानंद हायस्कूल (एमआयडीसी), सोलापूर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते, आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात येणार असून, मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा क्षेत्रातील अनुभवांवर आधारित चर्चासत्राचे आयोजनही करण्यात आले आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विविध क्रीडा संघटना, एनसीसी, मेरा युवा भारत अभियान, सामाजिक संस्था तसेच औद्योगिक प्रतिष्ठानांनी जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त विविध क्रीडा व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करावे. आयोजित उपक्रमांचा अहवाल व छायाचित्रे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सादर करावीत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे.

या कार्यक्रमास खेळाडू, पुरस्कार विजेते, पालक, क्रीडा प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# झाशीची राणी लक्ष्मीबाई पुण्यतिथी निमित्त अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आज धर्मवीर संभाजी तलाव येथील त्यांच्या पुतळ्यास उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, मधुसूदन पवार, सूर्यकांत देशमुख, गुरुराज कानडे, बाळासाहेब गोत्सुर्वे, अल्लबक्ष शेख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# समाज कल्याण कार्यालयासमोर 24 जूनला कंत्राटदारांचे 'ठिय्या आंदोलन'!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्यातील समाज कल्याण विभागांतर्गत विविध विकासकामे करणाऱ्या १५० ते २०० कंत्राटदारांची तब्बल २२ कोटी रुपयांची देयके गेल्या अडीच वर्षांपासून प्रलंबित आहेत. कामे पूर्ण होऊनही हक्काचे पैसे मिळत नसल्याने हवालदील झालेल्या कंत्राटदारांनी आता आंदोलनाचा पवित्र घेतला आहे. येत्या बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता सात रस्ता येथील जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयात भव्य 'ठिय्या आंदोलन' करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्य अध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले यांनी या आंदोलनाची अधिकृत घोषणा केली आहे.

**थकीत देयकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:**

- सन २०२३–२४ : ११ कोटी रुपये
- सन २०२४–२५ : ६ कोटी रुपये
- सन २०२५–२६ : ५ कोटी रुपये
- एकूण थकबाकी : जवळपास २२ कोटी रुपये

**स्वतःचे पैसे लावून केली कामे; अडीच वर्षांपासून देयके रखडली**

राज्यातील समाज विकास विभागाकडून विविध कल्याणकारी आणि पायाभूत सोयी–सुविधांची कामे केली जातात. याच अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील कंत्राटदारांनी स्वतःचे पैसे खर्च करून विभागाची स्थापत्य (सिव्हिल) कामे वेळेत पूर्ण केली. मात्र, गेल्या तीन आर्थिक वर्षांपासून या कामांचे पैसे प्रशासनाकडून मिळालेले नाहीत.

कामे संपून दोन ते अडीच वर्षे झाली तरी हक्काची रक्कम मिळत नसल्याने कंत्राटदार प्रचंड आर्थिक अडचणीत सापडले आहेत. बाजारपेठेतील देणी, कामगारांचे पगार आणि कर्जाचे हप्ते यामुळे कंत्राटदार व त्यांचे कुटुंबीय सध्या तीव्र मानसिक तणावाखाली जगत आहेत. वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने अखेर कंत्राटदारांनी आंदोलनाचा मार्ग निवडला आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेण्यासाठी संघटनेच्या वतीने सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, संबंधित खात्याचे सचिव, सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन पाठवण्यात आले आहे. २४ जून रोजी होणाऱ्या या ठिय्या आंदोलनात जिल्ह्यातील सर्व बाधित कंत्राटदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कंत्राटदार महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आषाढी यात्रा कालावधित कलम 163 चे घोषणापत्र जारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मा. पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जिविशा/आषाढीवारी / 2026–4591489 दि.05 जून 2026 अन्वये श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढीवारी यात्रा दि. 19 जुलै 2026 ते दि.29 जुलै 2026 याकालावधीत भरत आहे. यात्रेचा मुख्य दिवस दि.24 जुलै 2026 दशमी, दि. 25 जुलै 2026 देवशयनी आषाढी एकादशी व दि. 29 जुलै 2026 पौर्णिमा आहे. आषाढीवारी कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी / भाविक लोक श्री क्षेत्र पंढरपूर येथे येत असतात.

कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी / भाविक लोक श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येत असतात तसेच देशात, राज्यात व महत्त्वाच्या शहरे, धार्मिक व पर्यटन स्थळे इ. ठिकाणी दहशतवादी कारवायात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दहशतवादी कारवाया करणारे दहशतवादी हे स्थानिक लोकात मिसळुन तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्य करुन घातपाती कारवायांना अंतिम रुप देतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणातं मानवी जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होत असून त्याचबरोबर अशा घटनांमुळे जनमाणसात घबराटीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणाऱ्या घटना वारंवार घडत आहेत. सदर दहशतवादी कारवायामध्ये दहशतवादी हे जुनी वाहने, तसेच इतर वस्तुंचा वापर केल्याचे यापुर्वी आढळले आहे. तसेच ते सदर कारवायाच्या वेळी रुम / फ्लॅट / लॉज भाड्याने घेवून राहतात. मस्जिद, चर्च, धर्मशाळा येथे आश्रय घेतात किंवा सदरची जागा विकत किंवा लिजने घेतात. त्यासाठी ते स्थानिक ओळख म्हणून प्रॉपर्टी डिलर / ब्रोकर / एजंन्ट जुने वाहन खरेदी–विक्रि करणारे दुकानदार यांची मदत घेतात.

जिल्ह्यातील नविन राहण्यासाठी येणारे व्यक्ती, यांची माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील आपल्या स्थळ सिमा हद्दीत जी–जी व्यक्ती नव्याने राहण्यासाठी येईल त्या व्यक्तीस व जे कोणी अशा व्यक्तीस राहण्यास जागा उपलब्ध करुन देईल असे घरमालक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंन्ट, मस्जिद, चर्च, धर्मशाळा इत्यादीचे विश्वस्त यांना अशा अनोळखी नविन राहावयास आलेल्या व्यक्तींची त्यांच्या वास्तव्यासंबंधीची संपूर्ण माहीती न चुकता तो राहावायास आल्यानंतर किंवा विचारपुस केल्यावर लगेच संबंधीत पोलीस ठाणेला देणे गरजेचे आहे. जेणेकरुन भविष्यात होणाऱ्या दहशतवादी कारवाईस, गुन्ह्यास प्रतिबंध होवु शकतो व सार्वजनिक कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधित राहण्यास सहाय्य होईल. तसेच लोकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होवुन सार्वजनिक शांतता वाढीस लागण्यास बळ मिळेल. तरी वरील नमुद सर्व परिस्थितीचा विचार करुन याकरीता सोलापूर ग्रामीण जिल्हयात व सर्व नगरपालिका हद्दीत दिनांक–08 जून 2026 पासून पुढे 60 दिवस कालावधीत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 प्रमाणे घोषणापत्र लागू होणेस विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी असा आदेश काढण्यापूर्वी जिल्हयातील सर्व लॉज, हॉटेल, फ्लॅट, दुकाने, घर / जागा धार्मिक स्थळांचे विश्वस्त वा काळजीवाहक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंट, जुने घर खरेदी विक्री करणारे व्यक्ती व संस्था तसेच भाडयाने घर देणारे व्यक्ती व संस्था / घर मालकांना नोटीस देऊन त्यांची बाजू ऐकणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याने अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांच्या भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन आदेश दिला आहे की, सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व लॉज, हॉटेल, फ्लॅट, दुकाने, घरमालक, प्रॉपर्टी डिलर / ब्रोकर / एजंट, जुने घर विक्री–खरेदी करणारे व्यक्ती व संस्था, भाडयाने घर देणारे व्यक्ती व संस्था तसेच धार्मिक स्थळांचे विश्वस्त व काळजीवाहक यांना खालील कृत्यांना बंदी घालत आहे.

आषाढीवारी कालावधीत फ्लॅट, लॉज, मठ, धर्मशाळा, चर्च, मशिद, मंदिर व खाजगी निवासस्थाने या ठिकाणी अनोळखी अथवा संशयित इसमास त्याची ओळख पटवल्याशिवाय राहण्यास परवानगी देवु नये. भाडेकरुकडून रहिवाशी व ओळख असलेला पुरावा इत्यादी कागदपत्रांच्या छायांकीत प्रती घ्याव्यात.

आषाढीवारी कालावधीत स्फोटक पदार्थ, बार उडणारे पदार्थ सोबत बाळगू नये. तसेच गॅस, केरोसीन, डिझेल, पेट्रोल याचा वापर अत्यंत काळजीपुर्वक करुन सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.

# जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या उपस्थितीत मुंबई उपनगरात आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी मुंबई उपनगर जिल्ह्यात विविध ठिकाणी योग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, मुख्य कार्यक्रम सौमय्या महाविद्यालय येथे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व लक्षात घेऊन दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. यावर्षी मुख्य कार्यक्रमासोबतच बोरिवली येथील शैलेंद्र स्कूल आणि विलेपार्ले येथील एन. एम. कॉलेज येथेही योग दिनानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी नेहरू युवा केंद्र आणि दीक्षा कदम संस्था यांचे सहकार्य लाभले आहे.

या कार्यक्रमांना लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी, नामांकित खेळाडू तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहेत. योगाबाबत जनजागृती व्हावी आणि त्याचा अधिकाधिक प्रसार व्हावा, यासाठी जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये चर्चासत्रे, परिसंवाद आणि कार्यशाळांचे आयोजनही करण्यात येणार आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन योग दिन उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

**वर–वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

## सुडोकु – 281

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 6 | 7 | | 9 | 8 | |
| | 4 | | | | 1 | | 5 | 7 |
| | 2 | | | | | | | |
| 8 | 1 | | 3 | 9 | | | | 5 |
| 3 | | 7 | | 8 | 4 | 1 | | |
| 6 | | | 1 | | | 8 | 3 | |
| 2 | | 9 | 4 | | | | 7 | |
| 5 | 8 | | | | | 4 | 2 | 9 |
| | 7 | | | 2 | 8 | 5 | 6 | |

# ई-केवायसीच्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी संतप्त; मुदतवाढीची मागणी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांसाठी वार्षिक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३० जून निश्चित करण्यात आली आहे. मात्र, अक्कलकोट तालुक्यात ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणावर तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने हजारो शेतकरी अद्यापही ही प्रक्रिया पूर्ण करू शकलेले नाहीत. त्यामुळे पुढील हप्ता मिळण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

केंद्र शासनाने ३० जूनपर्यंत ई-केवायसी अनिवार्य केली असून, मुदतीत प्रक्रिया पूर्ण न झाल्यास पीएम-किसान योजनेच्या लाभावर परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांना ओटीपी पडताळणीमध्ये अडचणी येत आहेत. आधार कार्ड मोबाईल क्रमांकाशी संलग्न नसणे, पोर्टलचा सर्व्हर वारंवार बंद पडणे किंवा ओटीपी वेळेत न मिळणे यामुळे




अनेकांची प्रक्रिया रखडली आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी दूरवरून सीएससी केंद्रांवर येत असले तरी तांत्रिक अडचणींमुळे त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

बायोमेट्रिक पडताळणीदरम्यान वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या बोटांचे ठसे जुळत नसल्याची समस्या देखील गंभीर बनली आहे. दिवसभर प्रतीक्षा करूनही फिंगरप्रिंट पडताळणी न झाल्याने अनेक ज्येष्ठ शेतकरी हतबल झाले आहेत. अशा लाभार्थ्यांसाठी फेस ऑथेंटिकेशन तसेच सीएससी केंद्रांमार्फत पर्यायी पद्धतीने ई-केवायसीची सुविधा उपलब्ध असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

याशिवाय आधार कार्डावरील नाव आणि पीएम-किसान पोर्टलवरील नावातील स्पेलिंगमधील फरक, जन्मतारखेतील त्रुटी तसेच इतर माहितीतील विसंगती यांमुळेही अनेक शेतकऱ्यांची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

तांत्रिक अडचणींमुळे हजारो शेतकरी ई-केवायसीपासून वंचित राहत असल्याने शासनाने वस्तुस्थिती लक्षात घेऊन अंतिम मुदतीत वाढ करावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी खाजप्पा ढाले यांनी केली आहे.

# सोलापूर पोलिसांची आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक कामगिरी!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जगातील सर्वात कठीण आणि खडतर मानल्या जाणाऱ्या 'कॉम्रेड्स अल्ट्रा मॅरेथॉन' स्पर्धेत सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या दोन वीर जवानांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे आणि पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे अंगरक्षक पोलीस अंमलदार हेमंत वाघमारे यांनी या जागतिक स्पर्धेत सोलापूरसह महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल केले आहे.

**जगातील सर्वात कठीण धावसंख्या**

दक्षिण आफ्रिकेतील डर्बन शहरात या 'द अल्टिमेट ह्युमन रेस' म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रगीतानंतर पहाटे ५ वाजता या खडतर स्पधेर्ला सुरुवात झाली. डर्बन ते पीटरमॅरीट्सबर्ग या मार्गावरील ही ८५.७७७ किमी अंतराची अवघड चढाईची स्पर्धा होती.

या जागतिक स्पर्धेत जगभरातून तब्बल २१,६७८



धावपटूंनी भाग घेतला होता. या अत्यंत कठीण स्पर्धेत सोलापूरच्या या दोन्ही सुपुत्रांनी फिनिशिंग लाईन गाठत नवा इतिहास रचला:

पोलीस कॉन्स्टेबल हेमंत वाघमारे यांनी हे अवाढव्य अंतर अवघ्या ९ तास २९ मिनिटांमध्ये पूर्ण केले. त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलामधून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे यांनी हे अंतर १० तास २३ मिनिटांमध्ये यशस्वीरित्या पूर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले.

**मानवी क्षमतेची खरी कसोटी आणि तिरंग्याचा अभिमान**

ही केवळ एक धावण्याची स्पर्धा नसून मानवी क्षमतेची खरी कसोटी मानली जाते. स्पधेर्तील अनेक कटऑफ पॉईंट्स आणि निर्धारित वेळेत पोहोचण्याचे आव्हान पार करत, खराब हवामान, प्रखर थंडी, जीवघेणी उष्णता आणि मानसिक-शारीरिक आव्हानांवर मात करून या दोन्ही धावपटूंनी हे यश मिळवले.

अंतिम ४०० मीटरच्या टप्प्यात हजारो प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अंगावर शहारे आल्याची भावना या दोन्ही वीरांनी व्यक्त केली. अंतिम रेषा पार करून आंतरराष्ट्रीय भूमीवर तिरंगा फडकवतानाचा तो क्षण भारताचा अभिमान जगासमोर मांडणारा आणि अविस्मरणीय असा होता.

**पोलीस आयुक्तांकडून कौतुक**

सोलापूर पोलीस दलाचे नाव सातासमुद्रापार नेणाऱ्या या दोन्ही बहाद्दर अधिकाऱ्यांच्या अद्वितीय आणि उल्लेखनीय यशाबद्दल सोलापूर पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी एपीआय दत्तात्रय काळे आणि हेमंत वाघमारे यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीला लगाम

## १५ दिवसांत एसटीच्या उत्पन्नात ४३ कोटी ८३ लाखांची वाढ



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** राज्यातील बसस्थानक परिसरात सुरू असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधातील विशेष मोहिमेचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून, केवळ १५ दिवसांत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) उत्पन्नात तब्बल ४३ कोटी ८३ लाख रुपयांची वाढ झाली आहे.

परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या सूचनेनुसार तसेच औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यभरातील बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी प्रियांका नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई सुरू आहे.

१ ते १५ जून या कालावधीत एसटी महामंडळाचे एकूण वाहतूक उत्पन्न ४९५ कोटी ३४ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले. मागील वर्षीच्या याच कालावधीत हे उत्पन्न ४५१ कोटी ५१ लाख रुपये होते. त्याच्या तुलनेत यंदा ४३ कोटी ८३ लाख रुपयांची म्हणजेच ९.७१ टक्के वाढ झाली आहे. यामुळे एसटीच्या दररोजच्या सरासरी उत्पन्नात सुमारे ३ कोटी रुपयांची भर पडली आहे.

या कालावधीत रायगड विभागाने २ कोटी १७ लाख, पुणे विभागाने ५ कोटी ९७ लाख, सातारा विभागाने ३ कोटी ४६ लाख, छत्रपती संभाजीनगर विभागाने २ कोटी ६६ लाख, अमरावती विभागाने १ कोटी ६० लाख तर नांदेड विभागाने २ कोटी २७ लाख रुपयांची उत्पन्नवाढ नोंदवली आहे.

बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि महसुलावर मोठा परिणाम होत होता. न्यायालयाच्या आदेशानुसार बसस्थानकापासून २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परिवहन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस प्रशासन आणि एसटी महामंडळ यांच्या संयुक्त कारवाईमुळे प्रवाशांचा एसटीकडे ओढा वाढला असून त्याचे प्रतिबिंब उत्पन्नवाढीत स्पष्टपणे दिसून येत आहे. राज्यातील सर्व बसस्थानक परिसर अवैध प्रवासी वाहतुकीपासून मुक्त करण्यासाठी ही मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार आहे. एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# अन्यथा मी सोलापूरात अन्नत्याग आंदोलन करणार : फारुक शाब्दींचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात धीम्या गतीने विकास होत आहे, त्यानिमित्त शाब्दी सोशल वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने महापौर आणि स्थायी समिती सभापतींना निवेदन देण्यात आले. सोलापुर महानगरपालिकेत भारतीय जनता पाटीर्ची एक हाती सत्ता स्थापन झाली आहे. गल्ली पासून ते दिल्ली पर्यंत भाजप सत्तेत आहे, विकास मात्र ठप्प झाला आहे. सोलापूर शहरात अनेक स्मशानभूमीना महानगरपालिकेच्या वतीने मोठा निधी दिला आहे. मुस्लिम स्मशानभूमीच्या विकासासाठी एक रुपयाही निधी दिला जात नाही. फारुक शाब्दी व त्यांच्या समर्थकांनी निवेदन दिले आहे. फारूक शाब्दी यांनी स्थानिक प्रशासनाला ठणकावून



सांगितलं असून हीच मागणी घेऊन आम्ही मागच्या महिन्यात निवेदन दिले होते, मात्र आमच्या मागणीची दखल घेतली नाही. एक महिन्याच्या आत मुस्लिम स्मशानभूमी असो किंवा मुस्लिम व इतर वस्तींत विकास कामे केली नाही तर अन्नत्याग आंदोलन केले जाणार आहे. स्थानिक शासन किंवा राज्य शासनाला आंदोलनाची भाषा समजत असेल तर मी अन्नत्याग आंदोलन करणार असा इशारा फारुक शाब्दी यांनी दिला आहे.ही आंदोलन पूनम गेट येथे होणार आहे.

यावेळी निवेदन देताना राजा सर बागवान, कोमारो सय्यद, रियाज खरादि, अजहर शेख, याकुब शेख, शोएब खलिफा,बशीर शेख, महिबुब अली कुरेशी, जुबेर कुरेशी, रियाज बागवान, सुलतान शेख उपस्थित होते.

# शिवसेनेचा ६० वा वर्धापन दिन रक्तदान व शैक्षणिक साहित्य वाटपाने साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना पक्षाच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सोमपा गटनेते अमोल बापू शिंदे यांच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तकांचे वाटप तसेच भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला शिवसैनिक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर स्व. आनंद दिघे यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर रक्तदान शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. शिबिरात तब्बल ६० रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी



पार पाडली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य प्रवीणजी तानवडे, प्रकाश काका अवस्थी, युवानेते ज्ञानेश्वर आप्पा सपाटे, संजय सरवदे, राजकुमार शिंदे, आयुब पठाण, आकाश गजघाटे, देवा विटकर, शशिकांत शिंदे, जय मस्के, अनिताताई गवळी, उमाताई माळी, प्रभाकर गायकवाड, कुमार धुमाळ, माजिद बागवान, महादेव गवळी, बाळासाहेब पवार, जावेद पटेल, गणेश कुलकर्णी, विक्रांत वानकर, महेश गायकवाड, कुणाल दीक्षित, अयान बागवान, सचिन बसगीकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमामुळे रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित झाले, तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून समाजोपयोगी कायार्चा आदर्श निर्माण करण्यात आल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# आषाढी यात्रेत महिला वारकऱ्यांसाठी प्रथमच स्वतंत्र जर्मन हँगर्स



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त) :-** आषाढी यात्रेत सहभागी होणाऱ्या महिला वारकऱ्यांसाठी यंदा प्रथमच प्रत्येक प्रमुख पालखी तळावर भव्य जर्मन हँगर्स (निवारा शेड) उभारण्यात येणार आहेत. या निवारा केंद्रांमध्ये स्नान, प्रातर्विधी, कपडे बदलण्याची व्यवस्था तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या सदस्य ॲड. माधवी निगडे यांनी मांडलेल्या या प्रस्तावाला तत्काळ मंजुरी देण्यात आली असून यंदाच्या आषाढी यात्रेपासून ही व्यवस्था कार्यान्वित होणार आहे.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पुणे येथे मुख्यमंत्री वारकरी महामंडळाची बैठक पार पडली. या बैठकीस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री माधुरी मिसाळ, पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, सामाजिक न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी, वारकरी महामंडळाचे प्रतिनिधी तसेच संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती, संत तुकाराम महाराज संस्थान आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत ॲड. माधवी निगडे यांनी महिला भाविकांसाठी स्वतंत्र जर्मन हँगर्स उभारण्याचा प्रस्ताव मांडला. पालखी महामार्गावर महिला वारकऱ्यांसाठी स्वतंत्र निवारा केंद्रे उभारण्यात यावीत, त्यामध्ये कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र कक्ष, स्नानगृह, स्वच्छतागृहे तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. महिला वारकऱ्यांच्या वाढत्या सहभागाचा विचार करता ही सुविधा अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यंदाच्या आषाढी यात्रा २०२६ मध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दरम्यान प्रथमच महिला भाविकांसाठी स्वतंत्र निवारा केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. आषाढी यात्रा अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने घेण्यात आलेल्या या निर्णयाचे वारकरी संप्रदाय, महिला भाविक आणि विविध सामाजिक संघटनांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# मोहोळ वनपरिक्षेत्र अंतर्गत वनक्षेत्रावरील अतिक्रमण हटवले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या अंतर्गत येत असलेल्या मौजे आळजापूर (ता. करमाळा) येथील राखीव वन क्षेत्रात वनविभागाने एक अत्यंत मोठी आणि धडक अतिक्रमण विरोधी कारवाई पार पाडली आहे. येथील राखीव वन गट क्रमांक १७६, १७७, १७८, १७९ व १८२ मधील सुमारे ७ हेक्टर (१७ पेक्षा जास्त एकर) शासकीय वन जमिनीवर करण्यात आलेले अनधिकृत अतिक्रमण वनविभागाने पोलीस आणि महसूल प्रशासनाच्या संयुक्त मदतीने पूर्णपणे हटवून जमीन मोकळी केली आहे.

**२० झोपड्या जमीनदोस्त; १९ जणांना अटक**

मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, सदर राखीव वन क्षेत्रावर पारधी समाजातील काही व्यक्तींनी बेकायदेशीररित्या ताबा मिळवून त्या ठिकाणी २० झोपड्या उभारल्या होत्या. या संदर्भात वनविभागाने पूर्वतयारी करून अत्यंत गुप्ततेने व कडक पोलीस बंदोबस्तात ही मोहीम राबवली. कारवाई दरम्यान शासकीय वन जमिनीवर अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या सर्व २० झोपड्या पाडण्यात आल्या.

वन जमिनीवर बेकायदेशीररित्या अनधिकृत अतिक्रमण केल्याप्रकरणी घटनास्थळावरून १५ पुरुष आणि ४



महिला अशा एकूण १९ व्यक्तींना वनविभागाने ताब्यात घेऊन अटक केली. अटकेनंतर सर्व आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने गुन्याचे गांभीर्य विचारात घेऊन सर्व १९ आरोपींना १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी वनरक्षक श्रीमती आयेशा पाशामियाँ शेख यांच्या फियार्दीवरून मोहोळ वनपरिक्षेत्र कार्यालयात रॅ.गु.नं. ०५/२०२६ नुसार रीतसर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त फौजफाटा**

सदरची धडक कारवाई पुणे विभागाचे मुख्य वनसंरक्षक आशिष ठाकरे व सोलापूरचे उपवनसंरक्षक कुलराज सिंह यांच्या थेट मार्गदर्शनाखाली व नियोजनानुसार पार पडली. प्रत्यक्ष घटनास्थळावर सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे (EGS) व श्रीमती ऐश्वर्या शिंदे (CAMPA) यांनी मोहिमेचे नेतृत्व केले. वनपरिक्षेत्र अधिकारी (RFO): योगेश घोडके (मोहोळ), राजू आटोले (माळशिरस), रोहित गांगुर्डे (सोलापूर) आणि श्रीमती शीला बडे (बार्शी) यांच्यासह सोलापूर वनविभागातील सर्व वनपाल, वनरक्षक व वनमजूर असे मिळून ७५ ते ८० वन कर्मचारी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाचे २० पोलीस कर्मचारी या मोहिमेत तैनात होते.

पोलीस, महसूल आणि वनविभागाच्या या संयुक्त आणि कडक कारवाईमुळे सोलापूर जिल्ह्यातील शासकीय व राखीव वन जमिनींवर डोळा ठेवणाऱ्या भूमाफियांमध्ये आणि अतिक्रमण करणाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. आगामी काळातही राखीव वनांचे रक्षण करण्यासाठी अशाच प्रकारे तीव्र कारवाया केल्या जातील, असा स्पष्ट इशारा वनविभागाने दिला आहे.

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या 'एल निनो'च्या संभाव्य संकटामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

पशुपालकांना या संकटाचा सामना समर्थपणे करता यावा, यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुपालक व शेतकरी यांना पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गाई व म्हशींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात घट होऊ नये म्हणून पशुपालकांनी पोषक असणाऱ्या चारा पिकांची लागवड करावी. अशी पिके निवडावीत ज्यातून मुख्य शेतमाल (धान्य/उत्पादन) तर मिळेलच, सोबतीला जनावरांच्या पोषणासाठी दर्जेदार चाराही उपलब्ध होईल.

शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर अथवा पडीक जमिनीवर येणारे नैसर्गिक गवत वाया न घालवता त्याचे योग्य जतन करावे. पावसाची ओढ किंवा टंचाईच्या संकट काळात हेच गवत जनावरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आधार ठरणार आहे. भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या उपलब्ध जमिनीवर मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादनावर भर द्यावा. उत्पादित केलेला अतिरिक्त चारा 'मुरघास' किंवा सुक्या चाऱ्याच्या स्वरूपात साठवून ठेवावा, जेणेकरून जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

पशुसंवर्धन विभागामार्फत 'एल निनो'च्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी पशुपालक-शेतकरी बांधवांना विविध माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. या संभाव्य संकटकाळात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सक्षम असून, कोणत्याही शंका तसेच अडचणी संदर्भात पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर नंबरवरुन माहिती व पशुवैद्यकीय सेवा प्राप्त करुन घ्याव्यात, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी अशी पिके घ्यावीत जी तीव्र टंचाईच्या काळात पशुखाद्य (चारा) म्हणूनही उपयुक्त ठरतील; तसेच चाऱ्याची नासाडी न करता त्याचा प्रभावी वापर व व्यवस्थापन करावे. त्याचबरोबर, खरीप आणि रब्बी हंगामातील चारा पिके साठवून ठेवण्यासाठी 'सायलेज' (silage) तंत्रज्ञानाचा वापर करावा; जेणेकरून फेब्रुवारी ते जून २०२७ या टंचाईच्या काळात त्याचा वापर करता येईल. एल निनोच्या सावटामुळे उद्भवणाऱ्या संभाव्य टंचाईचा फटका आपल्या पशुधनाला बसू नये, ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. योग्य नियोजन, पोषक चारा पिकांची निवड व उपलब्ध चाऱ्याची साठवणूक करून आपण पशुधनाचे पोषण आणि आपले आर्थिक उत्पन्न दोन्ही सुरक्षित ठेवू शकतो. सर्व पशुपालकांनी या आवाहनाचा गांभीर्याने विचार करून तातडीने अंमलबजावणी करावी, ही विनंती.

**- डॉ. किरण पाटील,** आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य

# औषधे कोठूनही घेऊ शकता; रुग्णालयांची सक्ती चालणार नाही

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** डॉक्टर किंवा रुग्णालयाने लिहून दिलेली औषधे रुग्णांना कोणत्याही शासनमान्य परवानाधारक मेडिकल स्टोअरमधून खरेदी करण्याचा पूर्ण अधिकार आहे. विशिष्ट मेडिकल स्टोअरमधूनच औषधे खरेदी करण्याची सक्ती डॉक्टर, दवाखाना किंवा रुग्णालय करू शकत नाही, असे स्पष्ट निर्देश अन्न व औषध प्रशासन विभागाने दिले आहेत.

रुग्णांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्यांच्या हक्कांची माहिती मिळावी यासाठी सर्व रुग्णालये, दवाखाने आणि आरोग्य संस्थांमध्ये यासंदर्भातील माहिती फलक ठळकपणे लावण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. रुग्णांनी आपल्या सोयीनुसार आणि विश्वासार्ह परवानाधारक मेडिकल स्टोअरमधून औषधे खरेदी करावीत, असे आवाहनही करण्यात आले आहे. औषधे खरेदी करताना त्यावरील कालबाह्यता दिनांक (एक्सपायरी डेट), बॅच क्रमांक, कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) तसेच पॅकिंगची स्थिती तपासूनच औषधे घ्यावीत. याशिवाय औषधाचे बिल घेणे अत्यंत महत्त्वाचे असून भविष्यात तक्रार करावयाची असल्यास त्याचा उपयोग होतो, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. औषध विक्रीमध्ये सक्ती, गैरप्रकार किंवा नियमभंग आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांना केले आहे.



**खासगी रुग्णालयांतील औषध खरेदीबाबत प्रश्नचिन्ह**

अनेक खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांना संबंधित रुग्णालयातील मेडिकल स्टोअरमधूनच औषधे खरेदी करण्यास सांगितले जाते. अनेकदा गरजेपेक्षा अधिक औषधे लिहून दिली जात असल्याची तक्रारही नागरिकांकडून केली जाते. जागरूक नागरिक आवश्यक तेवढीच औषधे खरेदी करतात किंवा शिल्लक औषधे परत करतात. मात्र अनेक वेळा औषधे वापरात न आल्याने ती वाया जातात आणि रुग्णांचा आर्थिक तोटाही होतो. धडक कारवाईमुळे गैरप्रकारांवर आळा अन्न व औषध प्रशासनाचा कार्यभार आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्वीकारल्यानंतर विभागाकडून अन्नपदार्थ, हॉटेल, दूध डेअरी, आईस्क्रीम पार्लर, हॉस्पिटल, मेडिकल स्टोअर्स तसेच गुटखा, मावा आणि पानमसाला विक्रीविरोधात धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. या कारवायांमुळे अनेक गैरप्रकारांवर आळा बसल्याचा दावा केला जात असून नागरिकांना अधिक सुरक्षित व दर्जेदार खाद्यपदार्थ आणि औषध सेवा उपलब्ध होत असल्याचे सांगितले जात आहे.

# शहीद जवान आप्पासाहेब काटे स्मृतीस्थळ लोकार्पण सोहळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहीद जवान अप्पासाहेब काटे स्मृतीस्थळ लोकार्पण व पुण्यस्मरण सोहळा बुधवार दि.24 जून 2026 रोजी संपन्न होणार असुन, या सोहळ्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर मेजर मिलिंद देवदत्त तुंगार(नि) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांचे सोबत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कर्मचारी श्री बाळासाहे खराडे, कल्याण संघटक हे उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमाध्ये करमाळा तालुक्यातील सर्व माजी सैनिक व त्यांच्या विधवा यांच्या आडीआडचणी सोडवल्या जातील. तरी जास्तीत जास्त माजी सैनिक व विधवा यांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार (नि) यांनी केले आहे.